# MAHARASHTRA STATE COUNCIL OF EXAMINATION, PUNE

Government Commercial Certificate Examination

**2 JULY, 2018**

[Time : 11-30]

(Total Marks for Sections I and II : 100)

**MARATHI TYPEWRITING**

(30 Words Per Minute)

**SECTION - I**

**(Time Allowed : 1 Hour)**

**मराठी टंकलेखन**

(३० शब्द प्रति मिनिट)

**विभाग - १**

(वेळ : १ तास)

---

**प्र.1)** पुढील पत्र आकर्षक पद्धतीने टंकलिखित करा : **[गुण : ३०]**

**राजाराम पाटील कन्स्ट्रक्शन कंपनी**

१६, राजाराम पाटील मार्ग,

इंद्रप्रस्थ भवन,

पुणे

संदर्भ क्रमांक : एचआर/७१६-२० दिनांक : आजचा टाका

प्रति,

मा. संस्थाचालक,

विश्वास टंकलेखन व लघुलेखन संस्था,

शॉप नं. १२, विश्वरूपम् सोसायटी,

धानोरी रोड,

पुणे

विषय : टंकलेखन परीक्षा घेणेबाबत...

महोदय,

वरील विषयास अनुसरुन, आम्ही आमच्या कंपनीमध्ये नवीन लिपिकांची नेमणूक करीत आहोत. नव्याने भरती होणाऱ्या लिपिकांना प्रामुख्याने टंकलेखनाचे काम करावयाचे आहे. आमच्या विविध शाखांत त्यांना मुख्य टंकलेखन काम दिले जाणार आहे. त्यामुळे त्यांचे टंकलेखनाचे ज्ञान तपासून पाहणे आम्हांस गरजेचे वाटते. त्यामुळे येत्या महिन्यात आपल्या सोयीनुसार आपण त्यांची परीक्षा घ्यावी, अशी आम्ही आपणांस विनंती करतो. त्यासाठी आपणास योग्य ते मानधन देण्यात येईल.

आपण परीक्षेची तारीख आम्हांस कळवावी. त्यानुसार आम्ही उमेदवारांना आपणाकडे पाठवू. आपण वेळोवेळी आम्हांस योग्य ते सहकार्य करीत आला आहात. या वेळीही आपले सहकार्य अपेक्षित आहे. आपल्या उत्तराच्या प्रतीक्षेत. धन्यवाद.

आपला विश्वासू,

एच.आर. व्यवस्थापक
राजाराम पाटील कन्स्ट्रक्शन कंपनी

सोबत : काही नाही.

**प्र.2)** पुढील रकाना टंकलिखित करा. रकान्याच्या ओळी टंकलेखन यंत्रावर अथवा शाईने आखा. दर्शक बिंदू आवश्यक आहेत : **[गुण : ३०]**

**विविध दुकानांत उपलब्ध असलेल्या पारंपरिक**
**शिराच्छादनाचा तपशील दर्शविणारा तक्ता**

(मे, २०१३)

| अनु. नं. | दुकानांची नावे | फेटे | पगडी | गांधी टोपी |
|---|---|---|---|---|
| १. | विनीता वस्त्र भांडार .. | ७,९१६ | ३,०१५ | ५,६२५ |
| २. | विश्वास वस्त्रालय .. | २,०१८ | ९२६ | ३,०२७ |
| ३. | माधवी पेहराव .. | ७,२८६ | ९,१९२ | ७,२९३ |
| ४. | संपदा संस्कृती .. | ३,०२८ | ५,२०३ | ८,१९२ |
| ५. | विजय मंगल .. | ६,१०२ | ९,१९७ | ३,२९३ |
| ६. | गोरक्षनाथ वस्त्र .. | ९१६ | ३,०१६ | ४,०१५ |
| ७. | नम्रता भांडार .. | ३,०१६ | ७,१९२ | ८,१०२ |
| ८. | दत्तात्रेय पेहराव .. | २८३ | १०२ | १०२ |